महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.§com

जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८१ किंमत : ५ रु. | पाने ४



# दादा अनंतात विलीन

## अजित दादा परत या, अजित दादा अमर रहे, ...अशा घोषणा देत लाडक्या नेत्याला दिला अखेरचा निरोप



## साश्रू नयनांनी लाडका नेता अलविदा

वृत्तसंस्था । बारामती

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी सकाळी घडलेल्या एका भीषण विमान अपघातात मृत्यू झाला. मुंबईहून बारामतीकडे जात असलेल्या त्यांच्या खासगी विमानाचा बारामती येथे लँडिंगदरम्यान अपघात झाला. या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. मोठ्याप्रमाणावर असलेल्या जनसमर्थनामुळे त्यांचं पार्थिव काल बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. आज सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अत्यंसंस्कार करण्यात आले. या मैदानावर मोठा जनसागर जमा झाला होता. देशासह राज्याचे अनेक नेते अजित पवार यांच्या अत्यंविधीचे दर्शन घेण्यासाठी अत्यंविधीस्थळी दाखल झाले होते. पदाधिकारी, कार्यकर्त्यांपासून सगळेच जण मैदानावर 'अजित पवार अमर रहे' च्या घोषणा देत होते. हा अत्यंत भावुक क्षण संबंध महाराष्ट्रासाठी होता. संपूर्ण बारामती शहर शोकसागरात बुडाले होते. ही पोरकेपणाची भावना बारामतीकरांसाठी होती. अजित पवार हे काल सकाळी खाजगी विमानाने मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला.या दुर्घटनेत अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला. २८ जानेवारी बुधवारी सकाळी सुमारे ८.४५ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. सुरुवातीला या अपघाताबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नव्हती. मात्र, विमान दुर्घटना होऊन त्यात अजित पवारांचा मृत्यू झाल्याचे धक्कादायक वृत्त समोर आले. या अंत्यविधीला मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह देशासह राज्यातील अनेक ज्येष्ठ नेते, प्रशासकीय अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. अजित पवार यांनी १९८९ मध्ये आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. तेव्हा ते को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्ट्रीच्या बोर्डावर निवडून गेले होते. यानंतर, १९९१ साली पुणे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. अजित पवार १९९१ साली बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले. या काळात ते कृषी, फलोत्पादन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री होते. १९९१ ते १९९५ या काळात ते विधानसभा सदस्य होते. अजित पवार नोव्हेंबर १९९२ ते फेब्रुवारी १९९३ या काळात जलसंधारण, ऊर्जा आणि नियोजन या खात्याचे राज्यमंत्री होते.१९९१ सालपासून ते विधानसभा सदस्य आहेत. १९९९ ते २००४ या काळात ते पाणीपुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे आणि फलोत्पादन या खात्याचे राज्यमंत्री होते. १९९५ पासून २०१९ पर्यंत सलग ७ वेळा बारामती विधानसभा मतदार संघाचे आमदार आहेत. मंत्री, अर्थमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधीपक्ष नेते अशी पदं अजित पवारांनी भूषवली आहेत.



### सुविचार

शाळेत शिकलेला प्रत्येक धडा आयुष्याचा पाया मजबूत करतो.



सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:१४

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५९,८९५/- | ३,३५,०००/- |

**केळी भाव**

| | |
|---|---|
| नवती | : १३५५ ते १३६० |
| पिल बाग | : ११०१ ते ११०२ |
| कांदे बाग | : ---- |

## कोलंबियात लँडिंगच्या आधी विमान क्रॅश

### एका खासदारासह १५ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था । कोलंबिया

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी रोजी सकाळी विमान अपघातात निधन झालं. बारामतीत विमानाचं लँडिंग होत असतानाच विमानाचा अपघात झाला आणि यामध्ये अजित पवार यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त होत आहे.आता अशाच प्रकारची एक घटना कोलंबियामध्ये देखील घडली आहे.**

कोलंबियामध्ये भीषण विमान अपघात झाला आहे. या विमान अपघातामध्ये एका कोलंबियन खासदारासह आणखी १५ जणांचा मृत्यू झाला आहे. या विमान अपघाताच्या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

ही घटना बुधवारी व्हेनेझुएलाजवळील प्रदेशात घडल्याची माहिती सांगितली जात आहे.समोर आलेल्या वृत्तानुसार, हे विमान कोलंबियाच्या सरकारी मालकीच्या एअरलाइन्सचं होतं. या अपघाताच्या (पान २ वर)

## अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी ३ सदस्यीय पथक करणार

### • दुसऱ्यांदा लँडिंगचा प्रयत्न करताना घडली घटना

वृत्तसंस्था । बारामती

**येथे विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. या भीषण अपघाताच्या चौकशीसाठी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे.**



मंत्रालयातर्फे जारी करण्यात आलेल्या निवेदनामध्ये सांगितले आहे की, एएआयबी पथकाबरोबरच, नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयाचे एक तीन सदस्यांचे पथक अपघाताच्या दिवशी दुर्घटना स्थळावर दाखल झाले होते. एएआयबीचे डायरेक्टर जनरल यांनी देखील लिअरजेट ४५ विमान कोसळले त्या ठिकाणाला भेट देऊन तपासाचा आढावा घेतला. (पान २ वर)

### ➢ ब्लॅक बॉक्स ताब्यात घेतला

कॉकपिट व्हाईस रेकॉर्डर आणि फ्लाइट डेटा रेकॉर्डर, ज्याला एकत्रितपणे ब्लॅक बॉक्स म्हणतात, हे ताब्यात घेण्यात आले आहे. याच्या माध्यमातून विमानाच्या शेवटच्या क्षणांमध्ये नेमकं काय झालं? याबद्दल माहिती मिळवण्यासाठी त्याचे विश्लेषण केले जाईल. मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, एएआयबी नियम, २०२५ च्या नियम ५ आणि ११ नुसार तपास सुरू केला आहे. तसेच ही चौकशी कठोर स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजरनुसार केली जाणार आहे.

## अर्थसंकल्प कोण सादर करणार?

### अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे सरकार समोर प्रश्नचिन्ह

वृत्तसंस्था । मुंबई

**उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यंदा राज्याचा अर्थसंकल्प कोण सादर करणार? हा प्रश्न निर्माण झाला आहे. अर्थ खाते हे अतिशय महत्त्वाचे खाते असून ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) ज्येष्ठ मंत्र्याला दिले जाऊ शकते. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते तूर्तास आपल्याकडेच ठेवण्याची शक्यता अधिक आहे.**



राज्यातील सत्ता वाटपात अर्थ हे महत्त्वाचे खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेले आणि अर्थमंत्रीपदाचा मोठा अनुभव असलेले व अर्थविषयक दांडगा अभ्यास असलेले अजित पवार यांनी हे खाते भूषविले. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारच्या काळातही अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे होते. ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि सुनील तटकरे यांनी ते अनेक वर्षे भूषविले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सध्याच्या मंत्र्यांमध्ये अर्थ खात्याचा अनुभव व अभ्यास असलेले मंत्री नाहीत. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि हसन मुश्रीफ हे राष्ट्रवादी काँग्रेसमधील ज्येष्ठ मंत्री आहेत. अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडेच ठेवण्याचा (पान २ वर)

### • तूर्तास फडणवीस यांच्याकडेच कार्यभार?

फडणवीस हे उपमुख्यमंत्री असताना अर्थ खाते त्यांच्याकडे होते आणि त्यांचा या खात्याचा चांगला अभ्यासही आहे. अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यास सुरुवातीला भाजपचा मोठा विरोधही होता. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशन जवळ आले असल्याने या खात्याचा कार्यभार तूर्तास फडणवीस हे आपल्याकडे ठेवण्याची शक्यता अधिक असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## रिलायन्स समूहाची १८०० कोटींची मालमत्ता जप्त

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**रिलायन्स समूहाचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्याशी संबंधित कंपन्यांविरुद्ध सुरू असलेल्या मनी लाँड्रिंग प्रकरणाच्या चौकशीचा भाग म्हणून १,८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची नवीन मालमत्ता अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) बुधवारी जप्त केली.**

या कारवाईसह या प्रकरणात केंद्रीय तपास यंत्रणेने जप्त केलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य आता अंदाजे १२,००० कोटी रुपये झाले आहे. ही कारवाई रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड (आरसीएफएल), रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (आरसीएफएल), येस बँक घोटाळा तसेच रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडशी संबंधित कथित फसवणुकीच्या प्रकरणांशी संबंधित आहेत. नवीन जप्तींमध्ये रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे बीएसईएस यमुना पॉवर, बीएसईएस राजधानी पॉवर आणि मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडमधील शेअरहोल्डिंगचा समावेश असल्याचे ईडीने म्हटले आहे.

## संपादकीय

### अजितपर्व अलविदा...!

मृत्यू हे जीवनाचं अंतिम सत्य आहे. तो कुणाला कधी कुठे आणि कसा भेटेल याचा काहीही नेम नाही. सकाळी हसत घराबाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी परत येईलच याची खात्री नसते. तरीही आपण हे सत्य विसरून रोजच्या धावपळीत ताणतणावात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत राहतो. उद्याची चिंता, भविष्याची भीती आणि अजून मिळवायचं आहे या विचारात आजचा क्षण निसटून जातो. आजूबाजूला घडणाऱ्या दु:खद घटना आपल्याला क्षणभर थांबवतात. मन सुन्न होतं, डोळे पाणावतात आणि आयुष्य किती नाजूक आहे याची जाणीव होते. त्या वेळी लक्षात येतं की पैसा, पद, प्रतिष्ठा आणि सत्ता या सगळ्या गोष्टी तिथेच थांबतात. माणसासोबत जातं ते फक्त त्याने कमावलेलं प्रेम, माणुसकी आणि लोकांच्या मनात उरलेली आठवण. महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी नेतृत्व, कडक प्रशासक, दूरदर्शी नेता आणि जनतेसाठी झटणारे अजितदादा पवार अशी छाप सोडून गेले.

अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे त्यांच्या आजोळी झाला. अनंतराव पवार यांचे अकाली निधन झाल्यानंतर अजित पवार यांची जबाबदारी त्यांचे चुलते तथा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी घेतली. बारामतीमध्येच त्यांचे शिक्षण आणि राजकीय संस्कार झाले. सन १९८२ मध्ये छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाचा श्रीगणेशा केला.

संसदीय आणि विधानसभा राजकारणातील उदय (१९९१- १९९९): सन १९९१ मध्ये ते पहिल्यांदा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष बनले, जिथे त्यांनी सलग १६ वर्षे काम करत सहकार क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला. त्याचवर्षी त्यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. मात्र, केंद्रात संरक्षण मंत्री झालेल्या शरद पवार यांच्यासाठी त्यांनी आपल्या खासदारकीचा त्याग केला आणि राज्याच्या राजकारणात परतले. सन १९९१ पासून ते आजतागायत बारामती विधानसभा मतदारसंघाचे निर्विवाद नेतृत्व करत राहिले. सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून त्यांनी प्रशासकीय कामाचा अनुभव घेतला. प्रशासकीय शिस्त आणि कार्यसम्राट ही ओळख त्यांना येथूनच मिळाली. अजित पवार हे त्यांच्या पहाटे ६ च्या कामाच्या शिस्तीसाठी ओळखले जात. मंत्रालयातील अधिकारी असोत वा जिल्हाधिकारी, सर्वांना पहाटेच सूचना देऊन कामाला लावण्याची त्यांची पद्धत होती. जलसंपदा मंत्री म्हणून काम करताना त्यांनी राज्यातील सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प मार्गी लावले. ऊर्जा मंत्री असताना त्यांनी राज्याला लोडशेडिंगच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी सौर ऊर्जा आणि नवीन प्रकल्पांवर भर दिला. त्यांच्या कार्यकाळात बारामतीचा झालेला कायापालट हा महाराष्ट्रातील विकासाचे एक मॉडेल मानले जाते.

राजकीय भूकंप आणि उपमुख्यमंत्री पदाचा विक्रम: अजित पवार यांच्या राजकीय प्रवासात अनेक वादळे आली. नोव्हेंबर २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत केलेला पहाटेचा शपथविधी हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा राजकीय भूकंप मानला जातो. त्यानंतर महाविकास आघाडीत आणि पुन्हा २०२३ मध्ये महायुती सरकारमध्ये सामील होऊन त्यांनी एकूण सहा वेळा उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेण्याचा ऐतिहासिक विक्रम केला. त्यांच्या शब्दाला पक्षात आणि प्रशासनात प्रचंड वजन होते, ज्यामुळे ते सत्तेत असो वा नसो, राजकारणाचे केंद्रबिंदू राहिले.

अकस्मात निधन आणि अखेरचा प्रवास (२८ जानेवारी २०२६): २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८:४५ वाजता, बारामती येथे जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी जात असताना, त्यांचे हेलिकॉप्टर उतरताना झालेल्या भीषण अपघातात त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र सरकारने ३ दिवसांचा राज्य दुखवटा जाहीर केला आहे. त्यांच्या जाण्याने केवळ एक कणखर नेताच नाही, तर प्रशासनावर जरब असणारा एक लोकनेता महाराष्ट्राने गमावला आहे. अजितदादा पवार यांनी अकाली एक्झिट घेतली. आता फक्त अजितपर्व अलविदा...! त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

# शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली निवृत्त व्यक्तीला १ कोटी ३५ लाखांचा गंडा

## • सायबर पोलिसात अज्ञात भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीवर ५० टक्के नफ्याचे आमिष दाखवून जळगाव येथील एका ६१ वर्षीय निवृत्त व्यक्तीला तब्बल १ कोटी ३५ लाख ८५ हजार १८९ रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



फिर्यादी कमलाकर धोंडू चौधरी (वय ६१, रा. तिवारी नगर, महाबळरोड, जळगाव) हे सेवानिवृत्त आहेत. ३१ ऑगस्ट २०२५ ते २२ जानेवारी २०२६ या कालावधीत काही अज्ञात व्यक्तींनी त्यांच्याशी संपर्क साधला. फिर्यादीला 'Astha Trade 833 Education Community' नावाच्या ग्रुपमध्ये अ‍ॅड करण्यात आले. त्यांना 'ACSTRADE' नावाचे ऑनलाइन शेअर ट्रेडिंग अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगण्यात आले. भरलेल्या रकमेवर ५० टक्के नफा मिळवून देण्याचे खोटे आश्वासन देऊन आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

जेव्हा फिर्यादीने आपली रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती रक्कम मिळवण्यासाठी वेगवेगळे टॅक्स भरण्याच्या नावाखाली आरोपींनी वेळोवेळी विविध बँक खात्यांवर एकूण १,३५,८५,१८९ रुपये भरून घेतले. मात्र, कोणतीही रक्कम परत न करता त्यांची मोठी आर्थिक फसवणूक केली. फिर्यादीनुसार, कुणाल कुमार, नेहा बन्सल, आरव गुप्ता या व्यक्तींनी आणि मोबाईल क्रमांकावरून त्यांच्याशी संपर्क साधला होता. याप्रकरणी २७ जानेवारी रोजी जळगाव सायबर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सतीश गोराडे करत आहेत.

## स्व.अजित पवार यांची आज श्रद्धांजली सभा

प्रतिनिधी । जळगाव

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार यांची श्रद्धांजली सभा शुक्रवार, दि.३० जानेवारी रोजी काव्यरत्नावली चौक, जळगाव येथे सायंकाळी ६.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे. सदर आयोजन समस्त जळगावकर नागरिकांतर्फे करण्यात आले आहे. तरी महाराष्ट्र राज्याच्या लाडक्या स्व.अजित पवार यांना आदरांजली वाहण्यासाठी जास्तीत जास्त जळगावकर नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## हुतात्मांच्या स्मरणार्थ मनपात आज मौन सभा

प्रतिनिधी । जळगाव

भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्मांच्या स्मरणार्थ संपूर्ण देशभर सर्व कामकाज थांबवून शुक्रवार दि. ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून हा दिवस हुतात्मा दिवस म्हणून पाळण्याचे शासनाने निर्देश दिलेले आहेत. शासन निर्देशानुसार दि. ३० जानेवारी रोजी सकाळी १०.५९ वाजता महापालिकेतर्फे पहिला इशारा भोंगा वाजविण्यात येईल. त्यानंतर सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठ यामधील सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी जागेवर उभे राहून दोन मिनिटे मौन पाळावे,असे मनपा उपायुक्त निर्मला गायकवाड-पेखळे यांनी कळविले आहे.

# कुंचल्यातून उमटली भावपूर्ण श्रद्धांजली

## सुनील दाभाडे यांनी साकारले अजितदादांचे जिवंत तैलचित्र

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असताना, जळगावच्या प्रसिद्ध चित्रकार आणि कलाशिक्षक सुनील दाभाडे यांनी आपल्या कलेच्या माध्यमातून लाडक्या नेत्याला अनोखी आणि भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. दाभाडे यांनी आपल्या कुंचल्याच्या माध्यमातून ना.अजित पवार यांचे अत्यंत जिवंत आणि बोलके तैलचित्र रेखाटले आहे.**




सुनिल दाभाडे हे वास्तववादी चित्रशैलीसाठी ओळखले जातात. या चित्रात त्यांनी ना.अजित पवार यांच्या चेहऱ्यावरची सात्विकता, साधेपणा आणि व्यक्तिमत्त्वाची मृदू छटा अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह टिपली आहे. चित्र पाहताना ते प्रत्यक्ष समोर उभे आहेत, असा भास निर्माण होतो. अत्यंत कमी वेळात तयार केलेले हे चित्र सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनले असून, अनेकांनी त्याचे कौतुक केले आहे. कलाशिक्षक सुनिल दाभाडे म्हणाले, पवार कुटुंबियांवर कोसळलेला हा दुःखाचा डोंगर मोठा आहे.

एका कलाकाराकडे शब्दांपेक्षा भावना व्यक्त करण्यासाठी चित्र हेच मोठे माध्यम असते. छत्र हरपण्याचे दुःख मोठे असते, म्हणून मी माझ्या कलेच्या माध्यमातून अजितदादा पवार स्मृतींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या चित्रामागील संवेदनशील भावनांचा परिचय होत आहे.

सामाजिक, राजकीय आणि कला क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी या श्रद्धांजली चित्राचे कौतुक केले आहे. दुःखाच्या या प्रसंगात आपल्या लाडक्या नेत्याला कलेच्या माध्यमातून दिलेली ही मानवंदना अनेकांच्या हृदयाला भिडली आहे. सोशल मीडियावरून देखील या चित्रावर सकारात्मक प्रतिक्रिया उमटल्या आहेत.



जिल्ह्यात दौऱ्यावर असताना जळगाव शहरात आलेल्या कार्यक्रमात अजितदादा पवार यांच्याशी हस्तांदोलन करताना माजी खासदार डॉ. उल्हास पाटील व देवेंद्र मराठे.

## आठवणीतले दादा...



सन २०११ साली माजीमंत्री गुलाबराव देवकर यांच्या मधुबन या निवासस्थानी अजित दादांनी दिलेली भेट त्या वेळचे टिपलेले छायाचित्र.



एका कार्यक्रमानिमित्त जैन उद्योग समूहाला भेट दिल्यानंतर अजितदादा पवारांसोबत अशोक जैन.



निसर्ग कन्या कवियत्री बहिणाबाई चौधरी यांच्या असोदा येथील स्मारकाला मोजून ५ मिनिटात ४ कोटी ९० लाखांचा निधी मंजूर करून तात्काळ निधी मिळून दिला. परखड व सडेतोड भूमिका मांडणारा नेता अजित पवार यांच्यासोबत असोदा कवियत्री बहिणाबाई स्मारक समिती उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व्यापार व उद्योग आघाडीचे माजी महानगराध्यक्ष प्रदीप (बंडू) भोळे, संजय चव्हाण व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी.



जळगाव पिंप्राळा येथे सन २०१३ साली जळगाव महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान एकनिष्ठ कार्यकर्ते संजय चव्हाण यांच्या निवासस्थानी धावती भेट दिली असता राजू बाविस्कर व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी.

## पान १ वरुन

### अजित पवारांच्या विमान अपघाताची...

'तपास वेगाने सुरू असून अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स हा ताब्यात घेण्यात आला आहे', असे मंत्रालयाने एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे. तसेच, 'एक सखोल, पारदर्शक आणि निश्चित वेळेत पूर्ण होणारी चौकशी केली जाईल याची काळजी घेणे ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे', असेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. या मुद्द्यांवर असणार भर-अधिकाऱ्यांनी सांगितले की तपासकर्ते हे दृश्यमानतेची स्थिती, वैमानिकाने घेतलेले निर्णय आणि बारामती येथील अनियंत्रित धावपट्टीवरील ऑपरेशनल लिमिटेशन्स हे चौकशीसाठी महत्त्वाचे मुद्दे असणार आहेत. बारामती येथे अजित पवार प्रवास करत असलेल्या विमानाने लँडिंगचा दुसरा प्रयत्न केला असताना हा अपघात झाला. एएआयबीच्या तज्ज्ञांचे एक पथक बुधवारी संध्याकाळी घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी फॉरेन्सिक प्रक्रियेला सुरुवात केली, ज्यामध्ये विमानाचे उरलेले अवशेष ताब्यात घेणे, पसरलेल्या अवशेषांचे मॅपिंग करणे आणि महत्त्वाचे पुरावे गोळा करणे याचा समावेश आहे. तपास अधिकाऱ्यांनी विमानाची मालकी असलेल्या दिल्लीतील व्हीएसआर व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून विमानाचे एअरफ्रेम आणि इंजिन लॉगबुक्स, मेंटेनन्स रेकॉर्ड्स, इन्स्पेक्शनचा इतिहास, वर्क ऑर्डर्स आणि विमानात असलेली कागदपत्रे मागवली आहेत. तसेच क्रूच्या पात्रतेचे रेकॉर्ड्स आणि विमानाची सर्टिफिकेशन कागदपत्रे देखील डीजीसीएकडून मागवण्यात आली आहेत.

### अर्थसंकल्प कोण सादर...

निर्णय झाला, तर त्याचा कार्यभार त्यांच्याकडे जाण्याची शक्यता आहे. मात्र राज्याची आर्थिक परिस्थिती सध्या बिकट असून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज यांसह अनेक लोकप्रिय योजनांवर आणि पायाभूत सुविधा व अन्य प्रकल्पांवर मोठा खर्च होत आहे. शेतकरी कर्जमाफी करण्यासंदर्भातील निर्णय जूनपर्यंत घेतला जाईल, असे फडणवीस यांनी माजी आमदार बच्चू कडू यांच्या आंदोलनाच्या वेळी जाहीर केले आहे. आर्थिक आव्हाने मोठी असून अर्थ खात्याचा दांडगा अनुभव असलेल्या नेत्याकडेच हे खाते दिले जाईल. राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून सुरू होणार असून अर्थसंकल्पीय अधिवेशन तोंडावर असल्याने हे काम पार पाडण्यासाठी अनुभवी मंत्र्यांची गरज भासणार आहे.

### कोलंबियात लँडिंगच्या आधी ......

घटनेत विमानातील सर्व प्रवासी आणि विमानातील क्रू मेंबर्स यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर विमान चालवणाऱ्या सरकारी मालकीच्या सॅटेना एअरलाईन्सने म्हटलं की, 'ही घटना ज्या ठिकाणी घडली, तेथील स्थानिक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी विमान कोसळल्याची माहिती प्रशासनाला दिली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.दरम्यान, विमान अपघाताची घटना नेमकं कशी घडली? याची चौकशी करण्यात येणार आहे. या बरोबरच याच विमानात कोलंबियन संसदेचे सदस्य डायोजेनेस क्विंटेरो हे अपघाताच्या वेळी विमानात होते आणि या घटनेत त्यांचाही मृत्यू झाला.

# जिद्द, श्रम, प्रामाणिक प्रयत्नांच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते!

## पद्मश्री चैत्राम पवार यांचा विद्यार्थ्यांना सल्ला; रायसोनीत 'सदा-ग्यान सिरीज' व्याख्यानमालेला प्रारंभ

प्रतिनिधी । जळगाव

**संरक्षण, संवर्धन आणि पुनर्निर्माण हे संस्कार येणाऱ्या पिढीपर्यंत पोहोचविणे अत्यंत आवश्यक आहे. संसाधनांची कमतरता कधीच अपयशाचे कारण ठरत नाही; जिद्द, श्रम आणि प्रामाणिक प्रयत्न यांच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते, असे मत पद्मश्री चैत्राम पवार यांनी व्यक्त केले.**




जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे 'सदा-ग्यान सिरीज' अंतर्गत 'सुजलाम सुफलाम: प्रेरणादायी वाटचाल' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी रायसोनी इन्स्टिट्यूटच्या संचालिका प्रा.डॉ.प्रिती अग्रवाल, वनवासी कल्याण आश्रमचे राज्य व्यवस्था प्रमुख बाळा जोगी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा महाविद्यालय प्रमुख उमेश सोनवणे, दीपक परदेशी, अकॅडमिक डीन प्रा.डॉ. संजय शेखावत आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना पद्मश्री चैत्राम पवार यांनी, आजच्या प्रथम पुष्पाचे ब्रीद सुजलाम् सुफलाम आहे आणि हे केवळ घोषवाक्य नसून आम्ही ते जगून दाखवले आहे.

बारीपाडा या दुर्गम भागातील गावाचे भवितव्य बदलविताना जंगल, जल, जन (लोक), जमीन आणि पशुधन या पंचसूत्रांच्या बळावर गावाचे सोने केले. सन १९९० साली सुरू झालेली ही लोकचळवळ आजही अखंडपणे सुरू असून ती देशातील असंख्य गावांसाठी प्रेरणादायी ठरत आहे, असे सांगून जंगल वाचविण्यासाठी सुरुवातीला वृक्षतोड पूर्णतः थांबवून तब्बल ११०० एकर क्षेत्रावर सुमारे ४३५ प्रकारच्या जवळपास ५,००० झाडांची लागवड करण्यात आली. यामुळे सरपणाचा प्रश्न निर्माण झाला. मात्र, त्यावर मात करण्यासाठी सोलर कुकर, स्मोक-फ्री चूल यांसारख्या पर्यावरणपूरक उपायांचा अवलंब करण्यात आला.

गावातील विस्थापनाचे मुख्य कारण असलेल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी लोकसहभागातून परिसरात ७०० हून अधिक बांध बांधण्यात आले. परिणामी पाण्याचा प्रश्न सुटला आणि जमिनीची पोत सुधारण्यासाठी परंपरागत शेतीकडे वळत गो-आधारित आदर्श शेतीचा अवलंब करण्यात आला. पन्नासहून अधिक भारतीय पारंपरिक बियाण्यांचे संवर्धन करून शुद्ध अन्न ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यात आल्याचेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी रायसोनी इन्स्टिट्यूटच्या संचालिका प्रा.डॉ.प्रिती अग्रवाल, इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष सुनील रायसोनी यांनी देखील मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कल्याणी नेवे यांनी केले तर आभार शंतनू पवार यांनी मानले.

### ➤ ११,२०० हेक्टर क्षेत्रावर वनक्षेत्र

**मागील २१ वर्षांपासून वनभाजी महोत्सव सातत्याने आयोजित करण्यात येत असून, यंदाच्या महोत्सवात ६० गावांमधील २७ महिला सहभागी झाल्या होत्या. या महोत्सवात तब्बल ११० प्रकारच्या वनभाज्या सादर करण्यात आल्या. आज गावालगत ११,२०० हेक्टर क्षेत्रावर वनक्षेत्र निर्माण झाले असून, वृक्षतोड केल्यास दंडाची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. बारीपाडा गावाने अस्मिता आणि अस्तित्व जपत शाश्वत विकास साधला आहे. शासनाकडून कर्ज घेऊन गावात विविध उद्योग-धंदे सुरु करून ते कर्ज वेळेपूर्वी परत करणारे हे आदर्श गाव ठरले आहे. शुद्ध भोजन, शुद्ध ऑक्सिजन आणि शांत झोप ही विकासाची नवी व्याख्या बारीपाडा गावाने देशासमोर ठेवली असल्याचेही पद्मश्री चैत्राम पवार यांनी यावेळी सांगितले.**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# साकरीत दोघांची हत्या : आरोपींना फाशीची शिक्षा द्या; विविध संघटनांची मागणी

## शाळकरी अल्पवयीन मुलींची दुहेरी हत्या; मानवतेला काळिमा फासणारी घटना

भुसावळ । प्रतिनिधी

**तालुक्यातील साकरी येथे दि. २७ जानेवारी रोजी दोन अल्पवयीन मुलींची निर्घृण हत्येची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेने संपूर्ण परिसरात भीती, संताप आणि शोककळा पसरली आहे. अत्यंत अमानुष पद्धतीने करण्यात आलेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे समाज मन हादरले आहे.**

आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, साकरीत दोन अल्पवयीन मुली नेहमीप्रमाणे शिकवणीला जाण्यासाठी घराबाहेर पडल्या होत्या. त्यावेळी प्राथमिक अहवालांनुसार युवकाने मी तुम्हाला शाळेत सोडतो, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला आणि त्यांना दुचाकीवर बसवले. त्यानंतर त्यांना निर्जनस्थळी नेऊन विहिरीत ढकलून क्रूरपणे त्यांची हत्या करण्यात आल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही मुलींचे मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आले. शवविच्छेदनासाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले होते. याप्रकरणी भुसावळ पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. प्राथमिक चौकशीत एका संशयिताने मुलींना विहिरीत ढकलल्याची कबुली दिल्याची माहिती आहे. भुसावळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गंभीर आणि कठोर कलमांखाली तपास सुरू आहे. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण आहे. संतप्त नागरिकांनी आरोपीला पोलिसांच्या ताब्यातून सोडवून स्वतःच शिक्षा देण्याचा प्रयत्न केल्याचेही समजते.

**भुसावळ येथील प्रतिष्ठा महिला मंडळातर्फे निवेदन**

या घटनेच्या निषेधार्थ भुसावळ येथील प्रतिष्ठा महिला मंडळाच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन सादर देण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा रजनी संजय सावकारे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात ही घटना अत्यंत अमानुष, क्रूर आणि शाळकरी अल्पवयीन मुलींची दुहेरी हत्या मानवतेला काळीमा फासणारी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आरोपी अल्पवयीन असले तरी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता त्यांच्यावर सज्ञान आरोपीप्रमाणे कठोर कारवाई करून फाशीची





शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा भविष्यात अशा विकृत प्रवृत्तींना आळा बसणार नाही, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर उपाध्यक्ष सुनंदा भारुडे, अर्चना सोनवणे, लता सोनवणे, अलका भटकर यांच्यासह अनेक महिला सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

तसेच सकल लेवा समाजाच्या वतीनेही या हत्याकांडाचा तीव्र निषेध नोंदवण्यात आला आहे. प्रस्तुत निवेदनावर अध्यक्षा मंगला पाटील, प्रभावती पाटील, राजश्री कोलते, जोत्सना भोळे, शैलजा नारखेडे, सोनल महाजन आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. या घटनेनंतर महिलांमध्ये व पालकांमध्ये असुरक्षिततेची भावना तीव्र झाली आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कायदेशीर उपाययोजनांची मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, भुसावळ शहरातील सर्वपक्षीय नागरिकांनी दोन मिनिटे मौन पाळून मृत मुलींना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी नगराध्यक्षा गायत्री भंगाळे, उपनगराध्यक्षा शैलैजा नारखेडे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. भुसावळ येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी यांना या घटनेबाबत निवेदन देण्यात आले आहे. निवेदनावर शहराध्यक्ष संदीप सुरवाडे, पवन बुंदेले व पदाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### ➤ साकरीतील हत्याप्रकरणी वरणगावात निषेध

**साकरी येथील दोन अल्पवयीन शाळकरी मुलींच्या निर्घृण हत्येच्या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसरात भीती, संताप आणि शोककळा पसरली आहे. अत्यंत अमानुष पद्धतीने करण्यात आलेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे समाज मन हादरले आहे. आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्याची मागणी वरणगावातील सर्वपक्षीय पुरुष व महिलांनी वरणगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अमित बागुल यांचेकडे निवेदन देवून घटनेचा निषेध केला. यावेळी सविता माळी, रेखा देशमुख, तृप्ता महाजन, अरुणा इंगळे, भाग्यश्री सोनवणे, वेदना पाटील, शामल झांबरे, श्रध्दा गायकवाड, दीपाली माळी, मनिषा माळी, माधुरी हळदे, राम शेटे, विनोद झोपे, अतुल झांबरे, प्रशांत पाटील, अजय पाटील, शुभम जावळे, निलेश खाचणे, इफ्तेखार मिर्जा, महेश सोनवणे, बंडा पाटील आदी उपस्थित होते.**

---

# नगरसेवक सुनील चौधरी करताहेत प्रभाग ८ चा विकास

प्रतिनिधी । धरणगाव

● नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडविण्यावर भर, विकासकामांना मिळाली गती

**नगरपालिकेच्या प्रभाग क्र. ८ मधून नवनियुक्त नगरसेवक म्हणून निवडून आलेले सुनील चौधरी यांनी पदभार स्वीकारल्यापासून प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सक्रिय भूमिका घेतली आहे. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सदैव तत्पर असल्याचे चित्र दिसून येत आहे.**



नागरिकांकडून आलेल्या तक्रारी असोत की, मूलभूत सुविधा याबाबतच्या अडचणी, फोन येताच नगरसेवक पदाचा कोणताही आव न आणता चौधरी तात्काळ संबंधित ठिकाणी पोहोचत आहेत. प्रशासन यंत्रणेला कार्यरत करून समस्या त्वरित मार्गी लावत आहेत.

विशेष म्हणजे सुरू असलेल्या विकास कामांच्या ठिकाणी स्वतः उपस्थित राहून काम पूर्ण होईपर्यंत त्यांचा सातत्याने पाठपुरावा करत असल्यामुळे प्रभागातील विविध रखडलेली कामे वेगाने पूर्ण होत आहेत. रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज, स्ट्रीट लाईट्स आदी मूलभूत सुविधांबरोबरच नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. त्यांच्या या तत्पर जनसेवेचे नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. प्रभागातील रहिवाशांनी नगरसेवक सुनील चौधरी यांच्या कार्यपद्धतीचे स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. यावेळी बोलताना नगरसेवक सुनील चौधरी म्हणाले, माझ्या प्रभागातील मतदारांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला निवडून दिले, ही माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. नागरिकांच्या प्रत्येक समस्येचे निराकरण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

पुढील पाच वर्षांत प्रभागाच्या विकासातून मतदारांनी केलेल्या या उपकाराची परतफेड करणार आहे. प्रभाग क्रमांक ८ चा सर्वांगीण विकास, पारदर्शक कामकाज आणि थेट नागरिकांशी संवाद साधण्याची भूमिका यामुळे नगरसेवक सुनील चौधरी यांचे कार्य सध्या शहरात चर्चेचा विषय ठरत आहे. याप्रसंगी प्रभागात ए.सी.एस. महाविद्यालयाचे सचिव डॉ. मिलिंद डहाळे, माजी नगराध्यक्ष अजयशेठ पगारिया, सकल जैन समाजाचे अध्यक्ष राहुल जैन, अरविंद ओस्तवाल, दिलीप गुप्ता, श्री.डेडिया, महेश आहेरराव आदी उपस्थित होते.

# मरिमाता मंदिर जीर्णोद्धारानिमित्त महाआरती

प्रतिनिधी । धरणगाव



**येथील ग्रामदैवत मरिमाता मंदिराच्या जीर्णोद्धारानिमित्त मंदिर संस्थान व जागृती युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य महाआरती व महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडला.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी नगराध्यक्षा लीलाबाई चौधरी तसेच नगरसेवक, नगरसेविकांच्या शुभहस्ते विधीवत पूजन व भव्य महाआरती संपन्न झाली. यावेळी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गातील सेवेकऱ्यांनी सामुदायिक दुर्गा सप्तशती पठण करून उपस्थित भाविकांना अध्यात्मिक ऊर्जा प्रदान केली. यानंतर महाप्रसादास प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी सुमारे १५ हजारांहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. उत्कृष्ट नियोजन, स्वयंसेवकांचे शिस्तबद्ध कार्य व सुरळीत व्यवस्थेमुळे महाप्रसाद वितरण शांततेत पार पडले. या धार्मिक, सामाजिक कार्यक्रमास शिवसेनेचे उपनेते गुलाबराव वाघ, राष्ट्रवादीचे ज्ञानेश्वर महाजन यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर, नगरसेवक, नगरसेविका, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच मरीआई मंदिर संस्थानचे अध्यक्ष किशोर महाजन, उपाध्यक्ष राजेंद्र चौधरी, जागृती युवक मंडळाचे पदाधिकारी व विविध समाजाचे व संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते. महाप्रसादासाठी लागणारी भांडी श्री सावता माळी समाज सुधारणा मंडळाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. डी. महाजन, लक्ष्मणराव पाटील व रमेश चौधरी यांनी केले. देणगीची जबाबदारी आर.पी.पाटील, गुलाब महाजन, चैत्राम महाजन व संजय पवार यांनी सांभाळली. आदल्या रात्री मरिआई मंदिरात भजन, हरिपाठ व नामस्मरणाचा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला.

---

# गौरखेडा येथील सुपुत्र सचिन महाजन यांची बीएसएफमध्ये निवड



प्रतिनिधी । फैजपूर

गौरखेडा (ता. रावेर) येथील युवक सचिन विकास महाजन याची सीमा सुरक्षा दलामध्ये निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

सचिन महाजन यांचा संघर्षमय प्रवास सन २०१७ पासून सुरू झाला. सुरुवातीला केवळ धावण्याची आवड म्हणून त्यांनी सराव सुरू केला होता. त्यांनी ठरवले की, धावण्याच्या माध्यमातून पदक मिळवायचे आणि गावाची ओळख माझ्या नावाने व्हायला हवी. या प्रवासात त्यांना मित्र भूषण इंगळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

फक्त शारीरिक मेहनत नव्हे, तर अभ्यासही तितकाच महत्त्वाचा असल्याची जाणीव करून देत भूषण इंगळे यांनी त्यांना सीएमसीए, रावेर येथे शिक्षणासाठी पाठवले.

# कै.आर. बी. सूर्यवंशी स्मृतिप्रीत्यर्थ विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील शतकोत्तरी पी. आर. हायस्कूलचे दिवंगत उपमुख्याध्यापक कै. आप्पासाहेब आर. बी. सूर्यवंशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ इंग्रजी भाषेच्या दृढीकरणासाठी इंग्लिश स्टोरी टेलिंग कॉम्पिटिशन व इंग्लिश निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य व आत्मविश्वास वाढावा, तसेच इंग्रजी भाषेतील अभिव्यक्ती अधिक समृद्ध व्हावे, या उद्देशाने या दोन स्पर्धा आयोजित केल्या होत्या.**



या स्पर्धेत एकूण सुमारे ७० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. इंग्लिश निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक हर्षाली गणेश मराठे, द्वितीय क्रमांक हेमांगी ज्ञानेश्वर ठाकूर, तर तृतीय क्रमांक नम्रता प्रवीण ओस्तवाल यांनी पटकावला. तर इंग्लिश स्टोरी टेलिंग कॉम्पिटिशनमध्ये प्रथम मोहित कमोदे, द्वितीय काजल श्याम कोळी आणि तृतीय मृणाल पाटील यांनी यश संपादन केले. सर्व विजेत्या स्पर्धकांना मोमेंटो, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या स्पर्धांचे परीक्षण आर. जे. धनगर, पी.व्ही. असोदेकर, एन. सी. पाटील व एस. पी. सोनार यांनी केले. परीक्षकांचाही यावेळी मोमेंटो देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.अरुण कुलकर्णी होते.

अध्यक्षीय भाषणात त्यांनी अशा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या भाषिक समृद्धीचे प्रतीक असून प्रत्येक विद्यार्थ्याने विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव डॉ. मिलिंद डहाळे, संचालक अजय पगारिया, बीएसएनएलचे सेवानिवृत्त अधिकारी एम. एम. परदेशी व सामाजिक कार्यकर्ते देवालाल बयस यांसह मुख्याध्यापक मेजर डी. एस. पाटील उपस्थित होते. डॉ.मिलिंद डहाळे यांनी आपल्या मनोगतात दिवंगत आर. बी. सूर्यवंशी यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेत त्यांच्या योगदानाबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी. आर. सूर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन जी. पी. चौधरी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी पी.जी. पाटील, एस. बी. घुगे, योगेश नाईक व मिलिंद हिंगोणेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

# पिंपरी (प्र. उ.) ग्रामपंचायत सदस्य अपात्रतेला हायकोर्टाकडून स्थगिती

## शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याच्या कारणावरून विभागीय आयुक्तांनी केले होते अपात्र






प्रतिनिधी । पारोळा

**तालुक्यातील प्र.उ. मोंढाळे येथील रहिवासी पिंपरी ग्रामपंचायत सदस्या तसेच माजी उपसरपंच पुष्पा रामकृष्ण पाटील यांना शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले.या कारणावरून विभागीय आयुक्त नाशिक यांनी अपात्र ठरवून त्यांना पदावरून हटवण्याचे आदेशही पारित केले होते. सदर निर्णयाला हायकोर्टाकडून स्थगिती मिळाल्याने त्यांचे सदस्य पद अबाधित राहिले आहे.**

फेब्रुवारी २०२१ मध्ये ग्रामपंचायत पिंपरी (प्र. उ.मोंढाळे) गावाची सार्वत्रिक निवडणूक पार पडली होती. सदर निवडणुकीत पुष्पा रामकृष्ण पाटील ह्या सर्वसाधारण महिला प्रवर्गातून सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या. नंतर काहीकाळ त्यांनी उपसरपंच म्हणून कारभार पार पाडला. तक्रारदार गुलाब जगन्नाथ पाटील यांनी पुष्पा पाटील यांच्याविरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४ जे ३ अन्वये जिल्हाधिकारी जळगाव यांच्या समोर विवाद अर्ज दाखल करत पाटील यांना शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले. ह्या कारणावरून अपात्र करावे अशी मागणी केली होती.

सदर तक्रार जिल्हाधिकारी जळगाव ह्यांनी फेटाळून लावत विवाद अर्ज नामंजूर केला होता. सदर निर्णयाने व्यथित होऊन तक्रारदाराने विभागीय आयुक्त नाशिक यांच्या समोर अपील दाखल केले. विभागीय आयुक्त नाशिक यांनी खालील निर्णय व आरोपांची योग्य ती चौकशी न करता आणि केवळ याचिकाकर्त्याच्या मोघम वक्तव्याच्या आधारे पुष्पा पाटील यांना अपात्र ठरवले. तसेच त्यांना पदावरून हटवण्याचे आदेशही पारित केले. सदर आदेशाने व्यथित होऊन सौ पाटील यांनी औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल करत विभागीय आयुक्त नाशिक यांच्या निर्णयाला आवाहन दिले होते. विभागीय आयुक्तांचा निकाल हा योग्य त्या तथ्यांवर आधारित नसून याचिकाकर्त्यांचे पुरावे तसेच शासकीय चौकशी अहवाल या कडे आयुक्तांनी पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्या पाटील यांच्या वकिलांमार्फत करण्यात आला होता.

# धरणगाव येथील नगराध्यक्षांसह नगरसेवकांचा सत्कार

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील सावता माळी समाजाच्या वतीने धरणगाव शहरासह जिल्ह्यातील विविध नगर परिषदांमध्ये निवडून आलेल्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष तसेच सर्व नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ मोठा माळी वाडा समाज सभागृहात उत्साहात पार पडला.**

शहरात प्रथमच अशा सर्वसमावेशक स्वरूपाचा आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत सावता महाराज, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस नगराध्यक्षा लीलाताई चौधरी धरणगाव, नगराध्यक्षा संगीता महाजन रावेर, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन, उपनगराध्यक्षा सुनिता माळी एरंडोल, नगरसेविका वंदना इंगळे जळगाव, भारती महाजन, कविता पाटील, मीना चौधरी, रूपाली देवरे, मंदाकिनी येवले, आक्काबाई चव्हाण, ज्योती पाटील, अंजली विसावे, सोनाली कंखरे, हेमांगी अग्निहोत्री, मंगलाबाई महाजन, नगरसेवक लक्ष्मण माळी, विलास महाजन, हाजी इब्राहिम मोमीन, परमेश्वर महाजन, नितीन बयस, आदी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.